निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २१३ वा.
सोमवार - ०६ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247





# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार भरीव मदत करणार - केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह

**आत्ताच एक्सप्रेस**

**शिर्डी/ प्रतिनिधी/** अतिवृष्टी व पुरामुळे महाराष्ट्रातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून महाराष्ट्र शासनाकडून नुकसानीचा तपशीलवार अहवाल मिळताच केंद्र सरकार क्षणाचाही विलंब न करता शेतकऱ्यांसाठी भरीव मदत जाहीर करेल, अशी ग्वाही केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी दिली.

लोणी येथे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण व पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या नूतनीकरण शुभारंभप्रसंगी केंद्रीय मंत्री शाह बोलत होते. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री शाह म्हणाले, केंद्र सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ३ हजार १३२ कोटींची मदत मंजूर केली आहे. यापैकी एप्रिलमध्ये १ हजार ६३१ कोटी वाटप करण्यात आले असून, यात महाराष्ट्रासाठी २१५ कोटींचे विशेष मदत पॅकेज देण्यात आले आहे. कर्जवसुलीवर तात्पुरती स्थगिती व विद्यार्थ्यांसाठी परीक्षांमध्ये सवलती यांसारखे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत.पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मविभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकार आंदोलन, ग्रामीण विकास व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केलेले कार्य अभूतपूर्व आहे. त्यांच्या कार्याच्या पायावर आज महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र उभे आहे. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ व वैकुंठभाई मेहता यांनी सहकार चळवळीची पायाभरणी केली. विखे पाटील यांनी देशातील पहिला सहकारी साखर कारखाना सुरू करून शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा पाया रचला. व्यापाऱ्यांच्या घरात जाणारा पैसा शेतकऱ्यांच्या खात्यात जाऊ लागला.

डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये वित्त राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. त्यांनी आरबीआयमार्फत गुजरातमधील सहकारी बँकांना वाचविणारे महत्त्वपूर्ण 'रिव्हायव्हल पॅकेज' मिळवून दिले, असे केंद्रीय मंत्री शाह म्हणाले.१९५१ मध्ये ५० टन क्षमतेने सुरू झालेला डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना आज ७ हजार २०० टन क्षमतेने कार्यरत आहे. लवकरच त्याची क्षमता १५ हजार टनांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. १९७० मध्ये स्थापन झालेल्या डिस्टिलरीची क्षमता १५ केएलपीडी वरून ९० केएलपीडीपर्यंत वाढली असून २४० केएलपीडीपर्यंत विस्तारास मंजुरी देण्यात आली आहे. बायोगॅस संयंत्राची क्षमता १२ हजार घनमीटरवरून ३० हजार घनमीटरपर्यंत वाढविण्यात आली आहे. को-जनरेशन प्लांटमधून ८ मेगावॅट वीज निर्माण होते, असे त्यांनी सांगितले.



केंद्र सरकारने शेतकऱ्यांचा १० हजार कोटींहून अधिक प्राप्तिकर माफ केला आहे. यामुळे सहकारी साखर कारखान्यांवरील वार्षिक १०० कोटींचा करभार दूर झाला आहे. साखर उत्पादनासाठी लागणाऱ्या मोलायसिसवरील जीएसटी २८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला असून ३९५ वस्तूंवरील जीएसटी दरही घटविण्यात आले आहेत.

सहकारी साखर कारखान्यांनी मल्टी-फीड इथेनॉल प्रकल्प उभारावेत, ज्यातून मका व तांदळापासूनही इथेनॉल तयार करता येईल. अशा प्रकल्पांसाठी केंद्र सरकार कर्ज उपलब्ध करून देईल व इथेनॉल खरेदीत सहकारी संस्थांना प्राधान्य दिले जाईल, असेही केंद्रीय मंत्री शाह यांनी सांगितले.भारताला जगात पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी या दिवाळीत आपण सर्वांनी एकत्र येऊन घरात कोणतीही परदेशी वस्तू आणणार नाही असा संकल्प करावा. देशातील १४० कोटी लोकांनी व व्यापाऱ्यांनी 'मेक इन इंडिया'चा अंगीकार केला, तर २०४७ पूर्वी भारत जगातील पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल, असेही शाह यांनी नमूद केले.

नदीजोड प्रकल्पाद्वारे राज्याचा दुष्काळ दूर करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील यांनी महाराष्ट्रात सहकाराची चळवळ रुजवली आणि आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी जल नियोजनाच्या संदर्भात महाराष्ट्रात जागृती घडवून आणली. या दोघांच्या पूर्णाकृती पुतळ्यांचे अनावरण हे 'पद्मस्मरण' आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. आशियातील पहिला सहकारी साखर कारखाना असलेल्या प्रवरानगर येथील सहकारी साखर कारखान्याने १० हजार टीपीडीपर्यंत आता मजल मारली आहे. ही खरोखर अतिशय आनंदाची गोष्ट आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

महाराष्ट्र सहकाराची पंढरी आहे. या क्षेत्राच्या विकासाचे श्रेय डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता यांना जाते. त्यांनी सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली आणि पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर येथे उभा राहिला. महाराष्ट्रामध्ये ज्या-ज्या भागात सहकार चळवळ पोहोचली, सहकारी साखर कारखाने पोहोचले, तिथला शेतकरी समाधानी झाला आणि त्या ठिकाणचे औद्योगीकरणदेखील चांगल्याप्रकारे झाले, इथला शेतकरी संपन्न झाला.

पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकार चळवळ पुढे नेण्यासोबत जलसंवर्धन चळवळ महाराष्ट्रात रुजविण्याचे कार्य केले. राज्य शासनाने त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नदीजोड प्रकल्प राबविण्याचा आणि त्यातून राज्यातील दुष्काळ दूर करण्याचा निश्चय केला आहे. विदर्भामध्ये वैनगंगा - नळगंगा, तापीच्या खोऱ्यामध्ये पाणी आणायचं काम, उल्हास खोऱ्यातले समुद्रात वाहून जाणारे ५४ टीएमसी पाणी उचलून गोदावरीच्या खोऱ्यामध्ये आणून आणि गोदावरीच्या खोऱ्यातला दुष्काळ दूर करण्याचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. पुढच्या पाच ते सात वर्षात टप्प्या-टप्प्याने हे संपूर्ण पाणी गोदावरीच्या खोऱ्यामध्ये आणल्यानंतर नाशिक, अहिल्यानगर परिसर आणि मराठवाड्याचा दुष्काळ भूतकाळ असेल, असे कार्य राज्य शासन करेल, असे मुख्यमंत्री विश्वासाने म्हणाले.

प्रधानमंत्री मोदी यांनी पहिल्यांदा सहकाराचे महत्त्व समजून घेतलं आणि स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केले आणि सहकारातला कार्यकर्ता म्हणून पहिले सहकार मंत्री म्हणून केंद्रीय मंत्री शाह यांना जबाबदारी देण्यात आली. सहकारमंत्री म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर त्यांनी वेगाने निर्णय घेऊन या क्षेत्रातील धुरिणींना चकित केले. राज्यातल्या सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी ८ ते १० हजार कोटींची मदत देण्यात आली. सहकार चळवळ रुजविण्याचे कार्य केंद्र सरकारच्या चांगल्या निर्णयाने होत आहे. साखर कारखान्याच्या सर्क्यूलर इकॉनॉमी विकसित करण्यासाठी आता प्रयत्न करावे लागतील. साखर कारखान्याचा मालक शेतकरी आहे, म्हणून त्याच्या पाठीशी शासन उभे राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

शेतकऱ्याला अतिवृष्टीच्या संकटातून सावरण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत असून लवकरच भरीव मदत करण्यात येईल, यात केंद्र सरकारचेही सहकार्य मिळेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.



लोणी - प्रवरानगर देशातील ग्रामीण विकासाचे मॉडेल - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, लोणी-प्रवरानगर परिसरातून महाराष्ट्राला नाही तर देशाला सहकाराचा वारसा मिळाला. शेतकरी संघटित होऊन आणि एकजुटीने क्रांती घडवू शकतो हे या भूमीने दाखवून दिले. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी लोणीला पहिला सहकार क्षेत्रातील साखर कारखाना उभारून सहकाराची क्रांती घडवून आणली. शेतकऱ्यांच्या घामाला योग्य मोबदला मिळावा, त्यांच्या पिकाला चांगला भाव मिळाला पाहिजे, त्यांची मुलं शिक्षण घेऊन पुढे जावीत म्हणून विठ्ठलरावांनी संपूर्ण आयुष्य वेचलं आणि त्यांचा हाच वारसा लोकनेते बाळासाहेब विखे पाटील यांनी जीवापाड जपला. त्यांनी सहकार, शेतीपुरते कार्य मर्यादित न ठेवता प्रवरा मेडिकल कॉलेज, प्रवरा को-ऑपरेटिव्ह बँक, शैक्षणिक संस्था कृषी व आरोग्य प्रकल्प यांच्या माध्यमातून संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यालाच खऱ्या अर्थाने नवसंजीवनी दिली आहे. त्यानंतरही पुढील पिढीने हे कार्य पुढे नेल्याने आज लोणी-प्रवरानगर देशातील ग्रामीण विकासाचे मॉडेल म्हणून ओळखले जाते.

सहकारमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्राची वेगाने वाटचाल सुरू आहे. जुन्या परंपरा आणि नवतंत्रज्ञान, नवसंशोधन याची सांगड घालण्याचा प्रयत्न होतं आहे. साखर उद्योगांमध्ये पारदर्शकता आणण्यासोबत इथेनॉल उत्पादनाला चालना देण्यात आली आहे. त्याचा लाभ शेतकऱ्याला मिळाला पाहिजे असे केंद्राचे प्रयत्न आहेत. सहकाराच्या माध्यमातून देश आत्मनिर्भर होईल, महाराष्ट्र आत्मनिर्भर होईल यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. अतिवृष्टी आणि पुरामुळे संकटात आलेल्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारतर्फे मदत मिळेल असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

सहकारच्या प्रवासाला दिशा देणारा क्षण - उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रवरानगरच्या माळावर आशिया खंडातला पहिला सहकारी साखर कारखाना उभा केला आणि त्यामुळे महाराष्ट्राचा देशातल्या सहकारी साखर कारखानदारीला नवी दिशा मिळाली, महाराष्ट्र खऱ्या अर्थाने समृद्ध झाला. तर देशाचे पहिले सहकार मंत्री म्हणून अमित शाह यांनी साखर कारखान्यांना प्राप्तिकर रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. म्हणून सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील या सहकार चळवळीसाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या पिता पुत्रांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण देशाचे पहिले सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणे हा दुग्धशर्करा योग आहे. सहकाराच्या प्रवासाला एक नवीन दिशा देणारा हा एक महत्वाचा क्षण आहे, सहकारच्या शतकातले एक सुवर्णपान आहे.

शेतकऱ्याला आपली ताकद ओळखायला लावायची आणि सहकारच्या माध्यमातून त्याला सशक्त करायचं या विचारातूनच आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगरला उभा राहिला. हा केवळ उद्योग नव्हता तर तो ग्रामीण भारतातील परिवर्तनाचा एक आरंभबिंदू होता. आज या कारखान्याची क्षमता वाढत असताना शेतकऱ्यांनाही नवे तंत्रज्ञान स्वीकारून उत्पादन वाढवावे लागेल. सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या घरामध्ये समृद्धी आली, त्यांच्या मदतीने शिक्षण संस्था उभ्या राहिल्या, ग्रामीण भागामध्ये लक्ष्मी बरोबरच सरस्वतीदेखील नांदू लागली. सहकार चळवळ अडचणीत येत असताना केंद्र सरकारने 'सहकारातून समृद्धी' ही संकल्पना व्यवहारात आणली. मोलायसिसवरील कर २८ टक्क्यावरून ५ टक्क्यावर आणण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. नव्याने स्थापन झालेल्या सहकार क्षेत्रातील संस्थानमुळे राज्याच्या सहकार क्षेत्राला संजीवनी मिळाली आहे, असे श्री. पवार म्हणाले. नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी लवकरच पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना भरीव मदत करण्यात येईल, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

प्रास्ताविकात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, आजचा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल. केंद्रीय सहकारमंत्री प्रवरानगरमध्ये दुसऱ्यांदा येत आहेत. देशातील पहिल्या सहकार मंत्रालयाची जबाबदारी ते सक्षमपणे सांभाळत आहेत. केंद्र सरकारच्यावतीने सहकार चळवळीला दिशा देण्याचे काम केले जात आहे. राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी पश्चिम वाहिनींच्या नद्यांचे पाणी मराठवाड्यात आणण्याचे काम राज्य शासन करत आहे. येत्या काळात राज्य निश्चितच दुष्काळमुक्त होईल. सहकार चळवळीच्या विचारांशी कधीही प्रतारणा होऊ दिली जाणार नाही.

प्रवरा उद्योग समूहाच्यावतीने राज्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी १ कोटी रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.याप्रसंगी आमदार रवींद्र चव्हाण, शिवाजीराव कर्डिले, मोनिका राजळे, अमोल खताळ, आशुतोष काळे, किरण लहामटे, विक्रम पाचपुते, विठ्ठलराव लंघे, काशिनाथ दाते, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आदी उपस्थित होते.

## ग्रुप ग्रामपंचायत कानडगाव महमदपुर उपसरपंच पदी आजिनाथ महाराज जाधव यांची बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कानडगाव महमदपुर येथे उपसरपंच पदाच्या निवडणुकीत आजिनाथ महाराज जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. दिनांक ३० सप्टेंबर रोजी पार पडलेल्या निवडणुकीत एकूण दहा सदस्यांपैकी आठ सदस्य उपस्थित होते. या निवडणुकीत सर्व सदस्यांनी एकमताने जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब करत त्यांची निवड निर्विरोध केली.



या वेळी ग्रामपंचायत सभागृहात निवड प्रक्रिया शांततेत पार पडली. निवडणुकीचे अध्यक्षस्थानी ग्रामसेवक तसेच निवडणूक अधिकारी उपस्थित होते. सर्व सदस्यांनी परस्पर सहकार्य आणि सलोखा जपत ग्रामविकासासाठी एकत्रित काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या प्रसंगी गावातील ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपसरपंच पदी निवड झाल्याबद्दल आजिनाथ महाराज जाधव यांचे ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या पुढील कामकाजात सर्वसामान्यांच्या हिताच्या योजना राबविण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## ऊस उत्पादकाला मदत द्यायला हवी त्यावेळी त्याच्याकडून सक्तीनं वसुली अत्यंत चुकीची : शरद पवार

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुर्ण/प्रतिनिधी/** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुण्यात पत्रकारांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी ज्यांचं नुकसान झालं त्याच ऊस उत्पादकांकडून मोठी रक्कम मुख्यमंत्री निधीला देण्याचा घेतला आहे, असं म्हटलं. ऊस उत्पादाकांकडून सक्तीची वसुली करणं चूक असल्याचंही शरद पवार म्हणाले. शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निर्णयाचा फेरविचार करण्याचा आग्रह धरणार असल्याचं म्हटलं.

राज्यात अतिवृष्टी जी झाली त्यामुळं शेतकरी, पिकं यांचे अतोनात नुकसान झालं आहे. महाराष्ट्रात ऊस महत्त्वाचे पीक आहे.मराठवाड्यातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील ऊसाचे मोठे नुकसान झालं आहे, असं शरद पवार म्हणाले. काही ठिकाणी पीक वाहून गेलं, काही ठिकाणी जमिनी वाहून गेल्या त्यात किती नुकसान झालं आहे, याचा आढावा घेण्याची गरज होती. महाराष्ट्र सरकारने जास्त मदत केली पाहिजे अशी अपेक्षा आहे, असं पवार यांनी म्हटलं.

**ऊस उत्पादकाकडून सक्तीची वसुली अत्यंत चुकीची :शरद पवार**

शरद पवार म्हणाले की, आम्हाला सुद्धा आश्चर्य असं वाटलं की राज्य सरकारनं नुकसान ज्यांचं झालं त्यांना मदत करण्याच्या ऐवजी सगळ्या ऊस उत्पादकांकडून एक मोठी रक्कम मुख्यमंत्री निधीच्या साठी देण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. ज्यावेळेला ऊस उत्पादकाला मदत द्यायला हवी त्यावेळी त्याच्याकडून सक्तीनं वसुली करणं हे अत्यंत चुकीचं आहे. ते मी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालून त्यांनी या निर्णयाचा त्यांनी फेरविचार करावा, अशी आग्रहाची विनंती त्यांना करणार आहे, असं शरद पवार म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगरमधील एका कार्यक्रमात म्हटलं की, आपण जर विचार केला, या ठिकाणी २०० कारखाने आहेत. फारतर २५ लाख एका कारखान्याला त्या ठिकाणी आपण बाजूला शेतकऱ्याकरता काढून द्यायला सांगितलं तर त्या कारखान्यातल्या काही लोकांनी सगळ्यांनी नाही. काही लोकांनी असा गजहब उभा केला आणि म्हणाले,शेतकऱ्याकडून पैसे तुम्ही वसूल करताय, शेतकऱ्याकडून पैसे वसूल करताय, शेतकऱ्याकडून नाही तर तुमच्या कारखान्यातील नफ्यातून २५ लाख रुपये जो शेतकरी तुमच्याकडे त्या ठिकाणी शेतमाल टाकतो, तो तुमच्याकरता राब राबतो, हाडाचं काडं करतो, रक्ताचं पाणी करतो, त्या शेतकऱ्यावर त्या ठिकाणी अशा प्रकारची आपत्ती आली आणि तुम्हाला पाच रुपये द्यायला सांगितले तरी देखील तुम्ही मागे पुढे पाहता, आता अशे काही कारखाने आम्ही शोधून काढले आहेत, ज्यांच्याकडे शेतकऱ्यांचा काटा मारलो जातो.आता त्यांना मी दाखवणार आहे की तुम्ही शेतकऱ्याचा काटा मारुन मारुन या ठिकाणी पैसा जमा करता, शेतकऱ्याकरता २५ लाख रुपये द्या म्हटलं तर त्या ठिकाणी देण्याची दानत नाहीये, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ऊस गाळप मंत्री समितीच्या बैठकीत एक निर्णय घेण्यात आला होता. त्या निर्णयानुसार ऊसबिलातून प्रति टन १५ रुपयांची कपात करुन त्यापैकी ५ रुपये पूरग्रस्त शेतकऱ्यांना तर १० रुपये मुख्यमंत्री सहायता निधीत जमा होणार आहेत. सरकारच्या या निर्णयाला शेतकरी संघटनांकडून विरोध करण्यात आला होता.

ऊस गाळपातून प्रतिटन मुख्यमंत्री सहाय्यता निधी, वसंतदादा साखर संस्था, राज्य साखर संघ, साखर संकुल निधी, गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी महामंडळ यासाठी कपात केली जाते. नव्या निर्णयानंतर प्रतिटन २७.५० रुपये कपात होणार आहे.

# उपमुख्यमंत्री दोन, पुजेचा मानकरी कोण?

आषाढी-कार्तिकी भक्तगण येती म्हणत पंढरीलाही भाविकांची ओढ लागलेली असते, आषाढी झाल्यानंतर आता कार्तिकी एकादशीची तयारी सुरू आहे. मात्र, यंदाच्या कार्तिकी एकादशीला दोन उपमुख्यमंत्र्यांपैकी कोणते उपमुख्यमंत्री पंढरीच्या पांडुरंगाची पूजा करणार, ह्या प्रश्नाचं कोडं विठ्ठलाला म्हणजेच मंदिर समितीला पडलं आहे. आषाढी एकादशीची महापूजा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते व कार्तिकी एकादशीची महापूजा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्याची परंपरा विठ्ठल मंदिरात आहे. मात्र, राज्यात दोन उपमुख्यमंत्री असल्याने कार्तिकीची पूजा शिवसेनेचे एकनाथ शिंदे का राष्ट्रवादीचे अजित पवार? यापैकी कोणत्या उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करायची याची विचारणा आता मंदिर समिती विधी व न्याय विभागाकडे करणार आहे.पंढरीतील विठ्ठल मंदिर समितीच्या आज झालेल्या बैठकीत कार्तिकी एकादशीच्या या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार, कार्तिकीची पूजा शिवसेनेचे एकनाथ शिंदे का राष्ट्रवादीचे अजित पवार? यापैकी कोणत्या उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करायची याची विचारणा आता विधी व न्याय विभागाकडे मंदिर समितीकडून करण्यात येणार असल्याचे ठरले आहे.

त्यामुळे, उपमुख्यमंत्री दोन, पण पुजेचा मानकरी कोण? अशी चर्चा पंढरीत होत आहे. यंदा कार्तिकी एकादशी २ नोव्हेंबर रोजी होत असून यावर्षी कार्तिकीच्या पूजेचा मान कोणाला मिळणार हे औत्सुक्याचे असणार आहे.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडून श्री साईबाबा समाधीचे दर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**अहिल्यानगर/प्रतिनिधी/** केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री साईबाबा समाधी मंदिराला भेट




देऊन श्री साईबाबांचे दर्शन घेतले. यानंतर त्यांनी गुरूस्थानचे दर्शन घेतले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही श्री साईबाबा समाधीचे दर्शन घेतले.

त्यांच्यासमवेत जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) गिरीश महाजन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते.

श्री साईबाबा संस्थानच्यावतीने केंद्रीय मंत्री शाह यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर उपस्थित होते.

# नारायणदादांमुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुले मोठ्या पदावर-कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांचे गौरवोद्गार

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** महाराष्ट्राच्या निर्मितीसोबतच स्थापन झालेल्या खेड्यातील शाळांनी ग्रामविकासात मोठे योगदान दिले. स्व नारायणदादा काळदाते यांच्या मुळेच ग्रामीण भागातील कष्टकरी , बहुजन समाजातील मुले मोठ्या पदावर पोहोचू शकली, असे गौरवोद्गार मा. कुलगुरू डॉ.विजय फुलारी यांनी काढले.माजी कुलगुरु, प्राचार्य मधुकरराव गायकवाड यांच्यावतीने रविवारी (दि. पाच) बनसारोळा येथील महाराष्ट्र विद्यालयाच्या प्रांगणात कृतज्ञता सोहळयाचे आयोजन करण्यात आले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमास पदवीधर आमदार मा.सतीश चव्हाण, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी आ.वैजनाथ शिंदे, यांच्यासह माजी कुलगुरु डॉ.एन.व्ही.कल्याणकर (गडचिरोली), डॉ.देवानंद शिंदे (कोल्हापूर), माजी बिसीयुडी संचालक डॉ. भागवतराव कटारे, प्रकूलगुरु डॉ. वाल्मिक सरवदे, संचालक ज्ञानेश्वर काळदाते, बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.नरेंद्र काळे, अध्यक्ष भागवतराव गोरे, प्राचार्य डॉ .बाबासाहेब गोरे, अनिलपंत कुलकर्णी यांची मंचावर उपस्थिती होती . प्रारंभी संस्थेच्या वतीने मंगलाताई व प्राचार्य मधुकर गायकवाड यांचा पाहुण्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ.विजय फुलारी म्हणाले, कोणत्याही क्षेत्रात नावलौकिक मिळवायचा असेल तर पारंपरिक शिक्षणासोबतच व्यावहारिकता, शहाणपणाची जोड असायला हवी. प्राचार्य मधुकर गायकवाड यांनी नारायण दादांचा समाजसेवेचे काम पुढे नेले. स्व वसंतराव काळे यांची मोठे योगदान त्यांच्या जडणघडणीत आहे. गायकवाड सरांसारखाच सर्वांना सोबत घेऊन पुढे गेले पाहिजे, असेही कुलगुरू डॉ . विजय फुलारी म्हणाले.



अन्न, वस्त्र, निवारा अन् शिक्षण या चारही गोष्टी देणाऱ्यांबद्दल कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले, असे प्राचार्य मधुकरराव गायकवाड म्हणाले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी कार्यकारिणी सदस्य तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु म्हणूनही प्राचार्य गायकवाड यांनी काम उत्तम केले, असे आ. सतीश चव्हाण म्हणाले. माती आणि माता यांचे ऋण फेडण्याचा उपक्रम म्हणजे हा कार्यक्रम आहे, असे आ. विक्रम काळे म्हणाले. कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका डॉ.नरेंद्र काळे यांनी मांडली.

ग्रामीण भागातील शाळा वाचवण्याची गरज आज निर्माण झाली आहे, असे ते म्हणाले. नारायणदादा काळदाते आणि वसंतराव काळे यांच्यामुळे गायकवाड सरांसह मान्यवरांची जडणघडण झाल्याचा गौरवही डॉ. काळे यांनी केला. यावेळी डॉ.नयना गायकवाड, डॉ. वाल्मिक सरवदे, डॉ. देवानंद शिंदे, डॉ. एन व्ही कल्याणकर, वैजनाथ शिंदे, ज्ञानेश्वर काळदाते यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ.संजय शिंदे यांनी सन्मान पत्राचे वाचन केले.डॉ.अनुजा जाधव, प्रा. दादासाहेब लोंढे यांनी सूत्रसंचालन तर डॉ. सुषमा जाधव यांनी आभार मानले. प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत प्रा .निळकंठ, बाळासाहेब, विजय, उदय, अमोल , सुध्दा व भगवान गायकवाड यांनी केले.

# अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ अभिनेत्री संध्या

आपल्या अभिनय आणि नृत्य कौशल्याने मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या जेष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांचे वृद्धापकाळाने ४ ऑक्टोबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली. अभिनेत्री संध्या म्हणजे अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ. २७ सप्टेंबर १९३२ रोजी जन्मलेल्या अभिनेत्री संध्या यांचे पूर्ण नाव विजया श्रीधर देशमुख असे होते. त्यांचे वडील रंगभूमीवरील कलाकार होते. त्यामुळे अभिनेत्री संध्या यादेखील रंगभूमीवर काम करू लागल्या. त्यांच्या मोठ्या भगिनी वत्सला या देखील रंगभूमीवर काम करत असत. अभिनेत्री संध्या यांना लहानपणापासूनच नृत्याची आवड होती त्यामुळे त्या नृत्याचे देखील कार्यक्रम करत असत. याच नृत्याने त्यांना चित्रपट सृष्टीत प्रवेश मिळवून दिला. दिग्दर्शक व्ही शांताराम यांनी अमर भूपाळी या चित्रपटासाठी अभिनेत्री संध्या यांची निवड केली कारण हा चित्रपट तमाशाप्रधान होता. यातील मुख्य नायिका ही तमासगिरीन होती. सहकाजीकच नायिकेला नृत्य कौशल्याची जाण असणे गरजेचे होते. अभिनेत्री संध्या यांच्याकडे नृत्य कौशल्याची चांगली जाण असल्याने त्यांची या चित्रपटासाठी निवड झाली. या चित्रपटातील तमासगिरणीच्या भूमिकेसाठी अभिनेत्री संध्या यांनी खूप कष्ट आणि नृत्याचे धडे गिरवले. त्यांच्या या कष्टाचे चीज झाले. हा चित्रपट खूप गाजला. यातील गाणीही खूप गाजली. त्यानंतर त्यांना परछाई या हिंदी चित्रपटात खलनायिकेची भूमिका मिळाली या चित्रपटात त्यांनी संध्या हे नाव धारण केले पुढे हेच नाव रूढ झाले. झनक झनक पायल बाजे या संगीतप्रधान चित्रपटातही त्यांनी मुख्य नायिकेची भूमिका साकारली. या भूमिकेने त्यांना अनेक चित्रपट मिळवून दिले. तीन बत्ती चार रास्ता, दो आँखें बाराह हात, नवरंग यासारखे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील हिट झाले. नवरंग या चित्रपटातील जा रे जा नटखट.... या गाण्यात त्यांनी पुरुष आणि स्त्री अशा दोन्ही भूमिका निभावल्या. त्यानंतर त्यांनी स्त्री, सेहरा, लडकी सह्याद्री की, जल बन मछली नृत्य बिन मजली हे त्यांचे चित्रपट देखील गाजले. अभिनेत्री संध्या यांचा सर्वाधिक गाजलेला आणि लक्षात राहिलेला चित्रपट म्हणजे पिंजरा. या चित्रपटात त्यांनी साकारलेली नायिका अजूनही रसिकांच्या मनात घर करून आहे. अभिनय सम्राट निळू फुले, डॉ श्रीराम लागू यांच्यासारखे दिग्गज कलावंत असतानाही अभिनेत्री संध्या यांची भूमिका रसिकांच्या लक्षात राहिली. या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. या चित्रपटाने त्याकाळी विक्रम केला होता. चंदनाची चोळी अंग अंग जाळी हा त्यांचा शेवटचा चित्रपट. हा चित्रपटही गाजला. त्यानंतर मात्र त्यांनी मनोरंजन विश्वातून निवृत्ती स्वीकारली. अभिनेत्री संध्या यांनी राजकमल चित्रपट संस्थेखेरीज इतर कोणत्याही चित्रपट संस्थेच्या चित्रपटात काम केले नाही. शेवटपर्यंत त्या राजकमल आणि व्ही शांताराम यांच्याशी एकनिष्ठ राहिल्या. त्यांनी व्ही शांताराम यांच्याशी विवाह केला. व्ही शांताराम यांच्या त्या तिसऱ्या पत्नी होत्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. महाराष्ट्र सरकारने त्यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने गौरविले. अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ असलेल्या अभिनेत्री संध्या यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# तरुणाई ही राष्ट्राची ताकद - ॲड. शंकर चव्हाण

तरुणाई ही राष्ट्राची ताकद आणि भविष्यातील दिशा ठरवणारी शक्ती आहे. तुम्ही कोणत्याही राजकीय पक्षाला मनापासून समर्थक असाल, तुमचा हा प्रेम आणि निष्ठा समाज आणि राष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरू शकते; पण त्याचबरोबर चुकीला चुकीचीच नोंद करणे, अवास्तव गोष्टींना पाठींबा न देणे आणि निर्दोष असताना आरोपांना आव्हान करण्याची धाडसही ठेवावी, ही सवय प्रत्येक तरुणाने अंगिकारली पाहिजे. जेथे लोक आपल्या नेत्यांचे पंख धरून निःशब्द बसतात आणि चुकीच्या निर्णयांवर टीका करणे टाळतात, तेथे प्रगतीचा मार्ग बंद पडतो आणि समाजाला खरे मूल्य कधीच मिळत नाही. त्यामुळे पक्षप्रेम आणि तटस्थ विचार एकत्र चालविणे गरजेचे आहे; एकाच्या बाजूने दुसऱ्याच्या सत्याला दबवून ठेवण्यापेक्षा तरी विचारपूर्वक चूक सुचवणे हेच जवळचे कर्तव्य समजले पाहिजे.



आपल्या इतिहासात असे अनेक प्रसंग आहेत जेथे जनतेने सत्य बोलले नाही तर अन्याय टिकून राहिला. परंतु ज्यांनी न्यायासाठी धाडसाने उठून आवाज बुलंद केला, त्यांच्या मुळेच बदल आले. त्यामुळे आजची पिढी जर चुकीला गुणगाणे गात राहिली तर पुढील पिढी केवळ परंपरेच्या जंजीरात अडाची जाईल. राजकीय पक्षांना समर्थित करण्याची तुमची हक्क आहे, पण तो हक्क जबाबदारीबद्ध असावा. नेते जर चुकीचे निर्णय घेतात, तर त्यांना सुधारण्यासाठी आणि योग्य व्यवहार करण्यासाठी दबाव निर्माण करणे ही हीरकी भूमिका तुम्ही पार पाडू शकता. पक्षप्रेमामुळे जेव्हा आपण आपल्या समोर उभ्या असलेल्या त्रुटींकडे पाहायला नकार देतो, तेव्हा तो प्रेम अंध आणि धोकादायक ठरतो.

आजच्या डिजिटल युगात माहितीचे प्रमाण अनंत आहे, परंतु त्याचबरोबर अफवा आणि चुकीची माहितीही सहज पसरते. त्यामुळे विचारपूर्वक माहिती तपासणे, वेगवेगळ्या स्रोतांचा अभ्यास करणे आणि तर्कसंगत निकाल काढणे ही कौशल्यं प्रत्येक तरुणाने आत्मसात केली पाहिजेत. तथ्य ऐकूनही मनातील सत्य नष्ट होऊ नये, ही दक्षता महत्त्वाची आहे. जर आपण सहजतेने कोणत्याही वक्तव्याला मान्य करून घेतो आणि नंतर त्याचा वेध घेण्यास कधीच तयार राहत नाहीत, तर आपले लोकशाहीचे धडे अर्धवट राहतात.

भयही एक मोठा शत्रू आहे. पक्षाच्या विरोधात कोणीतरी आवाज उठवेल, अशा भीतीने अनेकांनी तुमच्या जीवनात असलेल्या मूल्यांना गुपितात ठेवले आहे. परंतु भीतीवर मात करणारेच खरे बदल घडवून आणतात. जर एखादा नेता चुकीचा निर्णय किंवा भ्रष्टाचार करत असेल तर त्याला निदर्शनास आणणे आणि त्याविरुद्ध निष्पक्षपणे आवाज उठवणे, हे देशभक्तीचेच काम आहे. विरोध करणे म्हणजे विरोधाभास नाही, तर ते एक जबाबदारी आहे ज्यातून राज्य व्यवस्थेची पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढते.

शिक्षण आणि संवाद हाच बदलाचा पाया आहे. आपल्या मित्रपरिवारात, कॉलेजमधील गप्पामध्ये, आणि सोशल मीडियावर तुम्ही जे विचार मांडता, ते विचार निःशब्दतेने न ठेवता प्रमाणभूत, सभ्य आणि ठोस दृष्टीकोनातून मांडण्याचे प्रयत्न करा. चुकीला चूक म्हणण्याची कला म्हणजे केवळ टीका करणे नव्हे, तर तो टीकात आधार असावा की सुधारणा कशी होऊ शकेल. एखाद्या धोरणात त्रुटी असल्यास ती सुचवताना त्याची जागतिक किंवा स्थानिक पार्श्वभूमी समजून घेणे आणि प्रकल्पात्मक पर्याय देणे आवश्यक आहे.

जर तुम्ही आज ही सवय लावली, तर तुम्ही केवळ एका व्यक्तीच्या विरोधात उभे राहणार नाहीत; तुम्ही संपूर्ण पिढीसाठी मार्गप्रदर्शक ठराल. समाजात स्वातंत्र्य, न्याय, जबाबदारी यांची जाणीव वाढविणे हे तुमच्या हातात आहे. त्यामुळे पक्षप्रेम आणि देशप्रेमात फरक ठेवा. पक्षासाठी अंधपणे उभे राहणे ही पराकोटीची भक्ती नाही, ती पराभव आहे ज्यातून समाजाला नुकसान होते.

हे लक्षात ठेवा की परिवर्तन लहान मुद्द्यांपासून सुरू होते - घरगुती चर्चेतून, शाळेतील वर्गातून, रस्त्यावरच्या छोट्या आंदोलनातून. तुम्ही जर आज चुकीला चूक म्हणण्याचा प्रयत्न करू लागलात, तर उद्या तुमच्या आवाजाला एक दिशा मिळेल आणि पुढे येणाऱ्या पिढ्यांना तेच मूल्य वारसादाखल मिळेल. या देशाचे भविष्य तुमच्या विचारस्वातंत्र्यावर अवलंबून आहे, आणि म्हणूनच मी तुम्हाला आवाहन करतो की तुम्ही नेहमी विचारपूर्वक निर्णय घ्या, चुकांना ओळखा आणि त्यांना सुधारण्यासाठी निडरपणे उभे रहा.

**-ॲड. शंकर चव्हाण,**
**मुंबई उच्च न्यायालय**

# पर्यटन; सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक विकासाचा आधारस्तंभ

जागतिक संतुलन टिकवीण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी सर्वच देशांनी पर्यटनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे.जगातील देशांना आर्थिकस्थिती बळकट करण्यासाठी पर्यटनाला चालना देण्याची नितांत गरज आहे.पर्यटनाचे महत्व आणि लोकप्रियता पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने १९८० पासुन २७ सप्टेंबर विश्र्व पर्यटन दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. कारण संयुक्त राष्ट्र संघाने २७ सप्टेंबर १९७० ला विश्व पर्यटन संघटनेचा संविधान स्वीकारला होता. जिवनामध्ये खुशी निर्माण व्हावी याकरिता पर्यटनस्थळांना भेट देने गरजेचे असते.पर्यटन फक्त जीवनात खुशीच निर्माण करत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक आणि आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावुन बळकट करण्याचे काम करीत असते.आज अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनामुळे मजबूत झाल्याचे दिसून येते.भारत पर्यटनासाठी व पर्यटकांसाठी स्वर्ग तर विश्र्व शांतीचा दुत आहे.पर्यटन हे जागतिक प्रदुषण नियंत्रणाचे सुध्दा महत्वाचे काम करीत असते.त्यामुळे पर्यटनावर जेवढा जास्त भर दील्या जाईल तेवढेच प्रदुषण कमी होईल व मानवजातीसह, जीवजंतू, वन्यप्राणी, जंगल संपदा यांना जीवदान व दिलासा मिळेल. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्व देण्याची गरज आहे.भारतात २८ राज्ये व ८ केंद्र शासीत प्रदेश आहेत. प्रत्येक राज्यात आपल्याला मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे पहायला मिळतात. आजही लाखो विदेशी पर्यटक भारतात येतात व पर्यटनाचा आनंद घेतांना दिसतात. पर्यटस्थळे देशाला सुशोभित करतात व देशाच्या विकासाला हातभार लावण्याचे व चालना देण्याचे काम पर्यटनाच्या माध्यमातून नेहमी होत असते.भारतात लाखोंच्या संख्येने विदेशी पर्यटक नेहमी येत असतात.

कारण जगाच्या पाठीवर भारतातील पर्यटनस्थळे ऐतिहासिक, पुरातन,नामांकित व सुशोभित आहे.यामुळे भारताला विदेशी चलन मोठ्या प्रमाणात प्राप्त होते. भारतातील पर्यटनामुळे विदेशी पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतातील पर्यटकसुध्दा अनेक रम्य ठिकानांणा भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवीतात.पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार मिळावा या उद्देशाने २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण देताना घोषणा केली की देशातील प्रत्येक नागरिकांनी दरवर्षी १० पर्यटन स्थळांना भेट देऊन भारताचा सन्मान वाढवावा.भारतातील राजे-महाराजे यांचे साहित्य, किल्ले, काश्मिरसारखी पर्यटनस्थळे,देवी-देवतांची नामांकित स्थळे,ताजमहल, कुतुबमिनार,बुध्दगया सारखी अनेक ऐतिहासिक स्थळे भारतात आहेत.

पर्यटनाला चालना मिळावी म्हणून अमेरिकन भारतीयांनी दरवर्षी पाच अभारतीय कुटुंबाना पर्यटक म्हणून भारतात पाठवावे असे आवाहन ह्युस्टनयेथील हाऊदी मोदीकार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी केले होते.कारण यामुळे पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल.जगात अनेक महत्वपूर्ण ठिकाणे आहेत.परंतु काही पर्यटन ठिकाणे निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे दुर्लक्षित होतांना दिसतात. ती वाचविण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी पुढाकार घेतला पाहिजे व पर्यटनाला चालना दिली पाहिजे. वाढते प्रदुषण,प्लास्टिकचे दुष्परिणाम, जगातील वाढते तापमान, भुकंप, सुनामी, महाप्रलय, ज्वालामुखीचा उद्रेक,वाढती लोकसंख्या यामुळे पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो व याचा दुष्परिणाम पर्यटकांवर होत असतो. याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे. याकरिता संपूर्ण जगाने विचार मंथन करण्याची गरज आहे. जगातील वाढत्या तापमानामुळे मोठमोठी ग्लेशीअर वितळत आहे.यामुळे पर्यटनावर,पर्यटकांवर आणि निसर्गावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.आज भारतातील व जगातील सर्वात मोठे पर्यटनस्थळ म्हणून गुजरात मधील नर्मदा नदीच्या काठावर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा स्टॅच्यु ऑफ युनिटी भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.या व्यतिरिक्त भारतात इतकी पर्यटनस्थळे आहेत की त्यांची तुलना करने कठीण आहे.भारतात गडकिल्ले, पुरातन भव्य मंदिरे, अजंठा वेरूळ सारख्या लेण्या, बौध्दगया, कुतुबमिनार,ताजमहाल इत्यादी अनेक ऐतिहासिक ठिकाणे पर्यटनाच्या बाबतीत प्रसीध्द आहे. आज जगाच्या दृष्टीकोणातुन विचार केला तर संपूर्ण भारतच पर्यटन स्थळाचा केंद्र बिंदू आहे.भारतात पर्यटन स्थळी देव-दानव, ऋषि-मुनी, साधु-संत, वेषभुषा, पुजापध्दती, भारतीय संस्कृती, विविध भाषा, थोरमहात्म्यांचा,क्रांतीकारकांचा व विविध धर्माचे्आ इतिहास अशा अनेक वेगवेगळ्या पध्दती, मनोरंजनात्मक, साहित्य, पौराणिक कथा, इतिहास व संस्कृतीचे दर्शन भारतातील पर्यटन स्थळी पहायला मिळते व पर्यटकांचे मन मोहून जाते. भारतात अनेक धर्माचे व पंथाचे लोक रहात असल्यामुळे याठिकाणी वेगवेगळ्या पध्दतीची पर्यटनस्थळे भाषा सुध्दा पहायला मिळते.भारतातील खान-पानाच्या पध्दतीचा विदेशी पर्यटक मोठ्या आनंदाने स्वाद घेतात. भारतातील इतिहास आहे की एकट्या महाराष्ट्रात ३१७ गडकिल्ले आहेत यातील फक्त ९६ गडकिल्ले पर्यटनस्थळे आहेत.परंतु आजही २२१ गडकिल्ले पर्यटनाची व पर्यटकांची प्रतिक्षा करीत आहे.यावर महाराष्ट्र सरकारने विचार करून संपूर्ण गडकिल्ले हेरिटेज, लग्नसमारंभ, मनोरंजनात्मक कार्यक्रम याकरिता भाडे तत्वावर देवु नये.यामुळे पर्यटनस्थळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.याला नाकारता येत नाही.सरकारने स्वत:चे पैशे खर्च करून पर्यटनासाठी सुशोभित केले पाहिजे.यातच महाराष्ट्राचा गौरव आहे.यामुळे भारतातील पर्यटनामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागेल.

कारण महाराष्ट्राचा इतिहास अजरामर आहे.भारतात आजही औरंगाबादला (संभाजीनगरला)पर्यटनसिटीम्हणुन संबोधल्या जाते. त्यामुळे पर्यटनाला जास्त महत्त्व देण्याची गरज आहे.कारण यामुळे पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होते.आज संपूर्ण विश्र्वाला पर्यटन वाढविण्यासाठी सामोर येण्याची गरज आहे.यामुळे जगात प्रदुषणमुक्त वातावरण निर्माण होईल,प्रत्येक देशात मित्रता वाढेल, पर्यावरणात सुधारणा होण्यास मदत होईल.या दृष्टीकोनातून २७ सप्टेंबरला संपूर्ण जगाने संकल्पकेला पाहिजे की पर्यटन हेच जनतेला आनंद प्रदान करू शकते.विश्वातीव देशांनी पर्यटनाकडे जातीने लक्ष दिले तर प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि बळकट होण्यास मदत होईल. त्यामुळे प्रत्येक स्तरातुन पर्यटनाला चालना मिळायलाच पाहिजे. पर्यटनामुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक व आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात चालना मिळते. पर्यटनामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रत्वाची भावना वाढते. परंतु जानेवारी २०२० पासुन चिनीचांडालांनी पर्यटनाला व पर्यटकांना ग्रहण लावल्याचे आपण पहाले.अतीथी देव भव म्हणजे पाहुण्यांचा सन्मान करने.परंतु चीनने संपूर्ण जगाच्या पर्यटनावर व पर्यटकांवर पाणी फेरल्याचे दिसून आले.त्यामुळे आज संपूर्ण जगासाठी चीन विषेला साप झाला आहे.जगात अनेक देशांमध्ये मोठ-मोठी पर्यटन स्थळे आहेत.युक्रेन पर्यटनाच्या बाबतीत व महिलांच्या सुंदरतेचे बाबतीत प्रसिद्ध आहे. परंतु गेल्या तीन वर्षांपासून युक्रेन-रशिया युद्धामुळे युक्रेन सध्याच्या परिस्थितीत स्मशानभूमी बनल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे चीनने श्रीलंकेला आर्थिकदृष्ट्या कंगाल केले आहे.त्यामुळे श्रीलंकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. याकरिता सध्याच्या परिस्थितीत श्रीलंका पर्यटनावर जास्त भर देत आहे.कारण जगातील अनेक लोक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून श्रीलंकेकडे पहातात.कारण श्रीलंकेची आर्थिक बाजू बळकट करण्याचे काम पर्यटनामुळे होत असते.

सध्याच्या परिस्थितीत जे-जे देश युध्दामध्ये किंवा गृहयुद्धात जखडले आहेत त्या-त्या देशावर पर्यटनाच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे.त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी संपूर्ण देशांनी शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे. मानवजाती, जीवसृष्टी,वन्यप्राणी, पशुपक्षी,स्थल,जल,वायु यांना जीवीत ठेवण्याकरिता व प्रदुषणावर मात करण्यासाठी जगाने पर्यटनाला प्रथम स्थान देवून पर्यटकांचे आकर्षण वाढविण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची गरज आहे.पर्यटन दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी पर्यटकांच्या हस्ते व सरकारच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करायला पाहिजे.

यामुळे पर्यटकांमध्ये नवीन आशा-अपेक्षा,आकांक्षा,नवीदिशा निर्माण होईल.भारत सरकारने जागतिक पर्यटन दिवसांच्या निमित्ताने सरकारने, प्रशासनाने आणि सामाजिक संस्थांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला पाहिजे.यामुळे पर्यटनात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसून येईल.

**-लेखक,रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# नादरपुर येथे शेतकरी ग्रामसभा विविध मुद्द्यावर चर्चा करण्यात आली

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील नादरपुर येथे शेतकरी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे मयत झालेल्या शेतकरी बांधवाना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी फुलंब्री तालुक्यातील सरपंच मंगेश साबळे व इतर सिल्लोड येथे उपोषणस बसलेल्या व्यक्तींना पाठिंबा दर्शविण्यात आला व तसा ठराव पारित करण्यात आला.

शासनाने दिलेल्या आश्वासनाचे प्रशासन पालन करीत नसल्याबाबत ग्रामपंचायत सदस्य किसन खंडू निकम यांनी प्रश्न उपस्थित केला त्यांनी सांगितले की, पानंद रस्त्यासाठी राज्याचे महसूल मंत्री यांनी मुरूम उपलब्ध करून देणे बाबत आश्वासन दिलेले आहे जसे की, ग्रामपंचायत ने तहसील कार्यालयांस पानंद रस्त्यावर मुरूम टाकण्यासाठी रितसर परवानगी मागितलेली असून अद्यापपर्यंत परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे ग्रामस्भेत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

तसेच मोठ्या उत्सहात घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा केलेली आहे परंतु नादरपूर येथील एकही घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळालेली नाही त्यामुळे घरकुल लभार्थ्यांनी तीव्र शब्दात शासनाचा निषेध व्यक्त केला शासनाकडे नियोजन नसल्याचे मत बाबुराव रंगराव निकम यांनी व्यक्त केले तसेच काही घरकुल लाभार्थ्यांनी सिल्लोड येथील अधिकृत ठेकेदाराकडून वाळू उपलब्ध करून घेतली असता गावातील लाभार्थी धोंडीराम नामदेव चौथमल यांना पोलीस ठाणे पिशोर येथील पोलिसानी त्रास दिला. शासन व प्रशासन यांनी घरकुल लाभार्त्यांना वाळू मोफत देण्यासाठी नियोजन करून शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी असे राजू हिंमत निकम यांनी सुचविले व त्यास सोमीनाथ किसन निकम यांनी अनुमोदन दिले.

तसेच पोपट फकिरराव निकम यांनी असे सुचविले की,अंजना -पळसी प्रकल्प पिशोर अंतर्गत झालेल्या पोटचाऱ्या दुरुस्ती बाबत अनेक वेळा मागणी करूनही दुरुस्ती करण्यात आलेल्या नाही त्यामुळे दि.२६-९-२०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पावसाचे पाणी शेतात जाऊन शेतकऱ्यांच्या शेतजमीनी वाहून गेल्या त्यामुळे आता तरी पाटबंधारे विभागाने पोटचाऱ्यांची दुरुस्ती करावी हा ठराव पारित करण्यात आला व त्यास नानाराव भीका निकम




यांनी अनुमोदन दिले त्याचप्रमाणे विष्णू देऊबा निकम यांनी असे सांगितले की,पंतप्रधान सडक योजने अंतर्गत रस्त्याच्या बाजूस असलेल्या नाल्याच्या काठावर असलेल्या संरक्षण भिंतीचे काम अपूर्ण असल्याने नाल्यास येणाऱ्या मोठ्या पुरामुळे लगत असलेल्या प्लॉट वस्तीतील घरात पाणी घुसून नुकसान होण्याचा धोका असल्याने सदर संरक्षण भिंतीचे काम संबंधित ठेकेदाराकडून पूर्ण करून घ्यावे असा ठराव मांडला असता त्यास पुंडलिक लक्ष्मण निकम यांनी अनुमोदन दिले. जलसंपदा विभागा अंतर्गत अंजना नदीलगतच्या पुलाबाबत असलेल्या संरक्षण भिंतीचे राहिलेले अपूर्ण काम तात्काळ पूर्ण करावे जेणे करून पुला लगतच्या दोन्ही बाजूचा रस्ता वाहून जाऊन पूल कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही असे श्री अजय काकासाहेब निकम यांनी सांगितले व त्यास धनजी आनंदा निकम यांनी अनुमोदन दिले. तसेच जलसंधारण विभागाने बांधलेला पुलाच्या खालील बाजूस असलेला सिमेंट बांध दुरुस्त करणे आवश्यक असल्याने सदर तात्काळ दुरुस्त करण्यात यावा असाही ठराव पारित करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या उपरोक्त मागण्याबाबत सकारात्मक कौल न मिळाल्यास दि.१४-१०-२०२५ रोजी लोकशाही पद्धतीने रस्ता रोको करण्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यानंतर माजी सरपंच लक्ष्मण बळी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले व दि. ११ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या शेतकरी बांधवाचा हबरडा मोर्चास उपस्थित राहण्याचे आवाहन केले व ग्रामपंचायत च्या वतीने इ - पीक पाहणी करणे बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ इ-पीक पाहणी करून कृष्णा मोरे यांच्याकडून करुन घ्यावी असे आवाहन केले.सदर ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी विलास रामचंद्र काथार व उपाध्यक्ष म्हणून भगवान तेजराव निकम तसेच सचिव म्हणून रामराव बळी यांनी काम पाहिले. ग्रामसभेस मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधव उपस्थित होते. शेवटी अध्यक्ष यांनी उपस्थित ग्रामस्थांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.या वेळी सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तंटामुक्त अध्यक्ष पोलीस पाटील गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## संक्षिप्त

### आपले गाव स्वच्छ सुंदर ठेवणे प्रत्येक नागरिकाची जबाबदारी

**जरंडी येथे स्वच्छता अभियानाला सुरुवात**




**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/विजय पगारे/**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान माध्यमातून शाश्वत विकास ध्येय अंतर्गत उद्दिष्ट साध्य करण्याची संधी शासनाने उपलब्ध करून दिली आहे.याकरिता एक दिवस, एक तास, एक साथ व श्रमदानातून आपले गाव स्वच्छ व सुंदर करणे हे प्रत्येक नागरिकाची जवाबदारी आहे असे आवाहन सरपंच स्वातीताई पाटील यांनी शुक्रवारी (दि.२) जरंडी येथे केले.२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत येथे स्वच्छता अभियान सुरुवात करण्यात आली. तसेच दर रविवारी सर्वांनी गाव स्वच्छता अभियानाकरिता एक दिवस एक तास एक साथ याप्रमाणे सहकार्य करण्याचे आवाहन ग्रामपंचायत जरंडी च्या वतीने करण्यात आले.यावेळी ग्राम पंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी अभियानाची माहिती दिली उपसरपंच संजय पाटील, सदस्य मधुकर पाटील, दिलीप पाटील,मधुकर सोनवणे, अमृत राठोड, बनेखा तडवी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व गावातील सर्व बचत गटातील महिला सदस्य लिपिक संतोष पाटील,सतीश बाविस्कर, अंबु राठोड, सिद्धार्थ दांडगे, सर्व ग्रामपंचायत कर्मचारी यांनी सहकार्य केले गावाच्या स्वच्छतेसाठी दररोज एक तास देऊन अभियान राबविण्याचा केला संकल्प यावेळी करण्यात आला जरंडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. सरपंच स्वाती पाटील, उपसरपंच संजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा गांधींच्या छायाचित्राला पुष्पार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांची उपस्थिती होती.

### गंगामाऊली शुगर मार्फत ऊस पिक परिसंवाद संपन्न

केज (प्रतिनिधी) गंगामाऊली शुगर या कारखान्या मार्फत कारखाना परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पुर्वहंगामी ऊस लागवड पद्धतीमुळे ऊस उत्पादनात होणारी वाढ या बाबत माहिती देण्याकरीता कृषिभुषन सन्मानित पाडुरंग आवाड रा. आवाड शिरपुरा यांचे पुर्व हंगामी व सुधारीत ऊस जातींची लागवड पर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्र कार्यक्रमात श्री.पांडुरंग (आबा) आवाड यांनी शेतकऱ्यांना पुर्व हंगामी ऊस लागवडी करीता जमीनीची पुर्व मशागत, लागवड हंगाम, सुधारीत ऊस जाती, सरीतील अंतर, खत व्यवस्थापन, एकात्मीक रोग व किड व्यवस्थापन या बाबत सखोल मार्गदर्शन केले. या चर्चासत्रास मस्साजोग, सांगवी सारणी, पिंपळगव्हाण, शिंदी, काळेगाव, आरणगाव, जाधव जवळा, कोरेगाव, सावंतवाडी, डोनगाव, सारणी आनंदगाव, सोनीजवळा, चिंचोली माळी, हादगाव, डोका व कारखाना परिसरातील शेतकऱ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदवला. या चर्चासत्रास गंगामाऊली शुगरचे त्यांनी केलेले ऊस शेतीतील सुधारीत प्रयोग या बाबत सखोल माहिती दिली.

# सोयगाव बसस्टँड परिसरात मोकाट गुरे व कुत्र्यांचा धुमाकूळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव /प्रतिनिधी/** सोयगाव बसस्टँड परिसरात मोकाट गुरे व भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिक, प्रवासी व विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी ही जनावरे बसस्टँड परिसरात मोकाट फिरत असतात.त्यामुळे अपघाताचा धोका कायम असून महिला व लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांकडून वारंवार तक्रारी करण्यात येऊनही नगरपंचायत प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः बस पकडण्यासाठी धावणारे प्रवासी व शालेय विद्यार्थी यांना या मोकाट गुरे व कुत्र्यांमुळे अनेकदा अपघाताचा धोका निर्माण होत आहे. आम्ही रोज या बसस्टँडवरून प्रवास करतो. गुरे व कुत्र्यांचा त्रास वाढला आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी स्थानिक प्रवाशांनी केली आहे.



**नागरिकांचा सवाल**

नगरपंचायत प्रशासन जर वेळेवर उपाययोजना करणार नसेल, तर पुढील काळात आठवडे बाजारात गर्दी कमी होईल. मोकाट जनावरांवर नियंत्रण नसेल तर अपघातांचा धोका नाकारता येणार नाही.दरम्यान, नगरपंचायत प्रशासनाने तातडीने मोकाट जनावरांवर नियंत्रण आणून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.




**सोयगाव आठवडे बाजारात मोकाट जनावरांचा उपद्रव**

तालुक्यातील आठवडे बाजारात मोकाट गुरांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत चालला आहे. बाजारात खरेदीसाठी आलेल्या शेतकरी व ग्राहकांना गुरांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गुरांच्या वावरामुळे फळभाज्या, धान्य व किरकोळ मालाची हानी होत असून अनेकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.गुरांचा उपद्रव इतका वाढला आहे की महिलांना व वृद्धांना बाजारात सुरक्षितपणे खरेदी करणे कठीण झाले आहे. लहान मुलांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत नगरपंचायतीने तातडीने लक्ष घालून मोकाट जनावरांना आळा घालावा, अशी मागणी नागरिक व व्यापारी वर्गातून होत आहे.

# आदित्य दंत महाविद्यालयाची क्रीडा क्षेत्रात मारली भरारी...

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी /** आदित्य दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धा मध्ये मोठे मिळवले आहे.३ ऑक्टोबर २०२५ रोजी जालना येथील क्रीडा संकुल येथे झालेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (चणक्ड), नाशिक द्वारे आयोजित विभागीय सामन्यांमध्ये आदित्य दंत महाविद्यालय, बीडने भाग घेतला. महाविद्यालयातील एकूण २१ विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेतला. यापैकी चार विद्यार्थ्यांची निवड आगामी आंतरक्षेत्रीय सामन्यांसाठी झाली: त्यामध्ये पुढील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.सुमेध पवार - डिस्कस थ्रो, हर्षदा पवार - कबड्डी,अदिती गोंजारी - कबड्डी,रिद्धी मोरे - उंच उडी याव्यतिरिक्त, विलास तोगरे यांनी दुसरे स्थान पटकावले, तर सर्वश्री खैरनार आणि सृष्टी इंगळे यांनी १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तिसरे स्थान पटकावले.रिद्धी मोरे यांनी डिस्कस थ्रोमध्ये दुसरे स्थान आणि गोळाफेकमध्ये तिसरे स्थान पटकावले, तर जान्हवी माळी यांनी डिस्कस थ्रोमध्ये तिसरे स्थान पटकावले.

शुभम आडेने ४०० मीटर धावण्यात तिसरे स्थान पटकावले आणि साहिल पोयंकरने गोळाफेकमध्ये तिसरे स्थान पटकावले.मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने उत्कृष्ट कामगिरी करत उपांत्य फेरी गाठली आणि स्पर्धेत दुसरे स्थान पटकावले.या प्रसंगी, संस्थापक अध्यक्ष सुभाषचंद्रजी सारडा सर यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रशंसनीय कामगिरीबद्दल



प्रोत्साहन दिले आणि त्यांचे अभिनंदन केले. आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या संचालक डॉ. अदिती सुभाषचंद्रजी सारडा मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि त्यांना त्यांच्या प्रतिभेचे प्रदर्शन करण्यासाठी अधिकाधिक संधी मिळत राहतील असे आश्वासन दिले. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना भविष्यात अशा कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रेरित केले.

# जवखेडा.खुर्द गावातील ड्रेनेज लाईन कामात भ्रष्टाचाराचा आरोप

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील जवखेडा खुर्द गावातील १५ वा वित्त आयोग योजनेतून करण्यात आलेल्या ड्रेनेज लाईन व बांधकामाच्या कामात गंभीर गैरप्रकार आणि अपहार झाल्याचा आरोप ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्यांनी केला आहे.

ग्रामपंचायत सदस्य वंदना शेषराव काचोळे, कुशवतीबाई पुंडलीक काचोळे, किशोर चंद्रभान काचोळे यांच्यासह गावातील नागरिकांनी या संदर्भात तक्रार नोंदवून सखोल चौकशीची मागणी केली आहे.या कामासाठी प्रत्येकी २.५ लाख खर्चासह एकूण ५ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, ग्रामसेवक, अभियंता, सरपंच व ठेकेदार यांच्या संगनमताने कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे आरोप करण्यात आले आहेत.

नागरिकांचे आरोप -

ड्रेनेज लाईन टाकताना सिमेंटऐवजी मातीचा वापर करण्यात आला.३०० मिमी व्यासाच्या पाईपऐवजी २०० मिमीचेच पाईप वापरले.अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे ४४ फूटाचे बांधकाम करण्याऐवजी केवळ १.६१.८ फूटच काम करण्यात आले. पाईपलाईन योग्य खोलीवर न टाकता कमी खोलीवर बसवण्यात आली.पाईप खाली काँक्रीट बेड न देता थेट टाकण्यात आले.निकृष्ट दर्जाच्या या कामामुळे ड्रेनेज लाईन मधून पाणी साचून गावात मोठी समस्या



निर्माण झाली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, पत्रकातील अटीशर्तींचे पालन न करता केलेल्या या कामामुळे लाखो रुपयांचा अपहार झाला आहे. तसेच ग्रामपंचायतचे सरपंचपद महिला आरक्षित असताना, निवडून आलेल्या सरपंच मिराबाई शिवाजी भडगे यांच्या ऐवजी त्यांचा मुलगा शरद भडगे हेच कामकाज पाहतात, असा आरोप ग्रामपंचायत सदस्य वंदना काचोळे यांच्यासह ग्रामस्थांनी केला आहे.गावकऱ्यांनी प्रशासनाकडे या सर्व गैरप्रकारांची चौकशी करून संबंधित सरपंच, ग्रामसेवक ठेकेदार व अभियंता यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# तालुक्यातील शेतीचे नुकसान भरपाई लाभार्थीच्या खात्यात तात्काळ जमा करा - भाऊसाहेब गवळी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** जामगाव व भेंडाळा मंडळासह संपूर्ण गंगापूर तालुक्यातील शेतीचे नुकसान भरपाई विम्याचे व त्यांच्या घरामध्ये पाणी शिरले त्यांचे पैसे तात्काळ लाभार्थीच्या खात्यावर जमा करावे नसता तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.जामगाव व भेंडाळा मंडळासह संपूर्ण गंगापूर तालुक्यातील शेती पीकाचे नुकसान भरपाई इतर सर्व पिके निस्ता भूत झाली भरपूर ठिकाणी संपूर्ण गावे वस्त्या पाण्याखाली जाऊन संसार उपयोगी वस्तू वाहून गेल्या पाण्यात वाहून गेलेले फक्त पीक नव्हते तर शेतकऱ्यांची स्वप्न कष्ट आणि लेकराची दिवाळी व मुलाची शाळेची फी अशी शेतकऱ्याची व्यथा आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांचा व लाभार्थ्यांच्या खात्यावर तात्काळ नुसकान भरपाई जमा करावी नसता प्रशासनाच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे



विम्याचे व त्यांच्या घरामध्ये पाणी शिरले त्यांचे पैसे तात्काळ लाभार्थीच्या खात्यावर टाकावे असे निवेदन तहसीलदार गंगापूर व कृषी अधिकारी यांना देण्यात आले. जामगाव भेंडाळा मंडळासह गंगापूर तालुक्यातील खरीप पिकाची शंभर टक्के नुकसान झाले असून पिकाच्या वरती पाण्याचा थर साचून पिकाचा अतोनात नुकसान झाला कापूस व मका आंदोलन करण्यात येईल यावेळी भाऊसाहेब गवळी कायगावकर, रामदास माने, बापूसाहेब गायकवाड, सदानंद गायकवाड, नारायण, शेख इनुस, ज्ञानेश्वर गायकवाड, अण्णासाहेब निरपळ, अशोक मोरे, खलील शेख, काकासाहेब मिसाळ, बाबासाहेब शिंदे, नजीर भाई शेख विजय नजन कचरू डहाळे आधी शेतकरी व लाभार्थी उपस्थित होते.

# तालुक्यात अवैध मुरूम उपसा जोमात

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/**गंगापूर तालुक्यातील अवैध मुरूम उपसा जोमात महसूल विभागाचे अधिकारी कोमात चर्चेला उधाण. अवैध मुरूम उपसा राजरोसपणे सुरू गायरान जमिनीवरून बेधडक मुरूम उपसा जोमात चालत आहे. याकडे महसूल विभागाचे अधिकारी जाणून बुजून डोळे झाक करत असल्याची चर्चा आहे. तेरी भी चूप मेरी चूप महसूल विभागाचे अधिकारी यांना हफ्ते चालू असल्यामुळे कारवाई होत नसल्याची चर्चा आहे. या अवैध मुरूम उपसा होत असल्याने मागील काही दिवसापूर्वी गंगापूर तालुक्यात एक घटना घडली आहे की मुरूम माफियामुळे चार निष्पाप जिवांचा गेला बळी; आता तरी लक्ष द्या! गंगापूर तालुक्यात चालू असलेल्या अवैध मुरूम उत्खननाबाबत महसूल प्रशासनाच्या कानावर ऊ जात नाही का? टेंभापूरी धरणात जे तीन अल्पवयीन मुले व एक युवक बुडाला व त्यांचा जागीच मृत्यू झाला यालाही कारणीभूत अवैध मुरम उपसा करणारे मुरम माफीयाच आहे. संपूर्ण गंगापूर तालुक्यातील गायरान जमिनी व लघु मध्यम व बृहत पाझर तलावे व धरणे मुरूम माफियानी पोखरून खाल्ले आहे. आठ ते दहा ठिकाणी मोठमोठाली खड्डे खोदून ठेवले आहे त्यामुळे अतिवृष्टीच्या पावसाच्या पाण्याने हे खड्डे भरले व पाण्याचा अंदाज येत नसल्याने अशा दुर्दैवी घटना घडत आहे. तहसीलदारसाहेब. पुन्हा एकदा मुरूम उपसा करणाऱ्या मुरूम माफियामुळे गेला चार निष्पाप जिवांचा बळी आता तरी लक्ष द्या अशी म्हणण्याची वेळ पुन्हा एकदा गंगापूर तालुक्यातील जनतेवर आली आहे.

**महसूल विभागाचे अधिकारी कोमात चर्चेला उधाण**

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस


# आत्मविश्वास, इच्छाशक्ती, कठोर परिश्रमाची तयारी व अभ्यासात सातत्य ठेवा, यश हमखास मिळेल

**कौतुक सोहळा : आमदार नारायण कुचे यांचा इयत्ता दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना सल्ला**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** आत्मविश्वास, इच्छाशक्ती, कठोर परिश्रमाची तयारी व अभ्यासात सातत्य ठेवा, यश हमखास मिळेल, असे प्रतिपादन आमदार नारायण कुचे यांनी व्यक्त केले. जालना शहरातील पाठक लॉन्सवर रविवारी सकाळी जालना जिल्हा चर्मकार समाजातर्फे इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्याचे उदघाटक म्हणून ते बोलत होते. प्रारंभी दीपप्रज्वलन करत महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना शहर मनपा आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर तर प्रमुख अतिथी म्हणून कल्याण डोंबीवली मनपा उपायुक्त वंदनाताई गुळवे, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, प्रा. डॉ. युवराज गहेराव, शिक्षक रोहिदास शिखरे होते. तर मार्गदर्शक म्हणून बुलढाणा येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक रमेश विठोरे व बदनापूर येथील रावसाहेब पाटील दानवे कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. ललीता भगुरे-आक्षेय होत्या. आ. कुचे म्हणाले, इयत्ता दहावी, बारावी, पदवीनंतर करीअरची निवड करताना केवळ प्रशासकीय सेवाच नव्हे तर उद्योग-व्यवसाय, राजकारणातही भरपूर संधी उपलब्ध आहेत, सर्वांसाठी ही क्षेत्रे खुली आहेत. त्यामुळे आपले ध्येन निश्चित करून त्या दिशेने मार्गक्रमण करा, तुम्हाला यश नक्कीच मिळेल. उपायुक्त गुळवे यांनी मुलगी शिकली तर घर-कुटूंबच नव्हे तर समाजाचा, देशाचा ती भक्कम आधार बनू शकते असे स्वानुभव सांगत मुलींना भरपूर शिकवून स्वावलंबी बनवण्याचे आवाहन त्यांनी पालकांना केले. प्राचार्य डॉ. भगुरे यांनीही गुणवंतांना सर्वत्र विपूल संधी असल्याचे नमुद केले. यावेळी त्यांनी विज्ञानातील विविध दाखले देऊन शिक्षणाचे महत्व सांगितले. शिक्षक शिखरे यांनी शालेय शिक्षणाचे महत्व पटवून देत यात पालकांची भूमिका विषद केली. प्राचार्या भगुरे-आक्षेय यांनी मोबाईल, एआय यासारख्या नवतंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बन्सीदास ढवळे, सुत्रसंचालन प्रा. जया वडोदे-डोंगरे तर उपस्थितांचे आभार सचिन इरछे यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.



**प्रशासकीय सेवेतून समाजाची सेवा करता येते**

विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून प्रशासकीय सेवत यावे जेणेकरून समाजाची सेवा करता येईल, गोर-गरीब, गरजूंना मदत करता येईल. प्रत्येकाला कामानिमित्त प्रशासकीय अधिकार्यांकडे यावेच लागते, त्यांच्या स्वाक्षरीला महत्व आहे. यामुळे स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी बना आणि आपल्या समाजाची सेवा करण्याचा सल्ला प्रा. डॉ. गहेराव यांनी दिला.

**क्षमता ओळखून करीअर निवडा**

नीट, जेईई परीक्षेची तयारी करणार्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली असून यातून प्रचंड स्पर्धाही निर्माण होत आहे.

मात्र, आपली आवड, अंगभूत क्षमता व भविष्यातील संधी लक्षात घेऊन क्षेत्र निवडले तरच भरघोस यश मिळू शकते, यामुळे कुणाच्या सांगण्यावरून नव्हे तर स्वत:च्या क्षमता ओळखून करीअर निवडा असा सल्ला दुय्यम निरीक्षक रमेश विठोरे यांनी दिला.

## संक्षिप्त

### राजेगाव येथील शेतकरी उगले यांच्या उपोषणाला शिवसेनेचा पाठींबा




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** महाराष्ट्रातील शेतकर्यांची कर्जमाफी व्हावी व मराठवाड्यातील अतिवृष्टीकस्त शेतकर्यांना तात्काळ मदत मिळावी यासह शेतकर्यांच्या विविध मागण्यांसाठी घनसावंगी तालुक्यातील राजेगाव येथील शेतकरी गजानन रामनाथ उगले हे मागील सहा दिवसांपासून जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करत आहेत.आज त्यांची भेट घेऊन शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या व त्यांच्या उपोषणास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा पाठिंबा दिला. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश नळगे, जिल्हासंघटक भानुदास घुगे, किसान सेना संघटक मुरलीआबा थेटे,तालुकाप्रमुख हरीहर शिंदे, संदीप कंटुले, अनंता वैद्य, आबा कदम बाबुराव कायंदे, प्रभाकर उगले, बबनराव मिसाळ यांच्यासह आदीं पदाधिकार्यांची यावेळी उपस्थिती होती.

# नागरिकांच्या आरोग्यावर विषारी छटा टाकणाऱ्या भेसळखोरांना वेसण घाला-डॉ.हुलगेश चलवादी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/**सणासुदीच्या काळात दूध,मिठाई, पनीर, तूप, सुकामेवा यासह विविध खाद्यपदार्थ आणि सर्वसामान्यांना दिला जाणाऱ्या शिधा मध्ये होणारी भेसळ चिंतेची बाब आहे. ही भेसळ केवळ नफेखोरी नसून नागरिकांच्या आरोग्यावर केलेला उघड हल्ला आहे. सर्वसामान्यांच्या आरोग्यावर विषारी छटा टाकणाऱ्या भेसळखोरांना वेसण घालण्याची मागणी यानिमित्ताने बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव, पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी केली आहे. अन्न व औषधी प्रशासन विभागाने आक्रामक कारवाई केली नाही, तर बसप कार्यकर्ते भेसळखोरांना चोपल्याशिवाय राहणार नाही, असा थेट इशारा देखील डॉ.चलवादी यांनी दिला.

दूध, मिठाई, शिधात केली जाणारी भेसळ म्हणजे समाजाच्या आरोग्याशी केलेली गद्दारी आहे. दुधात डिटर्जंट, यूरिया, कॉस्टिक सोडा, स्टार्च, फॉर्मेलिन, कृत्रिम दूध, रंगद्रव्ये वापरून भेसळ केली जाते. ही भेसळ आरोग्यसाठी घातक आहे. भेसळ करणाऱ्या समाजविघातक प्रवृत्तींचा बंदोबस्त करणे हे प्रशासनाचे नैतिक व कायदेशीर कर्तव्य आहे. अन्न व औषध प्रशासनांची पथकांनी केवळ शहरासह ग्रामीण भागात, बाजारपेठांमध्ये आणि लहान दुकानदारांकडे तपासण्या कराव्यात, असे आवाहन, डॉ.चलवादी यांनी केले.

खोट्या लेबलखाली निकृष्ट दर्जाचे गोडे, कृत्रिम रंग युक्त पनीर, रसायन मिसळलेले तूप बाजारात विकले जात आहे. यामुळे अनेकांना अपचन, ॲसिडिटी, त्वचाविकार, यकृत व किडनी विकार होतात.कित्येकदा हे प्रकरण मृत्यूपर्यंतही पोहोचते.

तरीसुद्धा प्रशासन झोपले आहे का? असा संतप्त सवाल डॉ.चलवादींनी उपस्थित केला.

भेसळ करणाऱ्या कंपनी, दुकानदारांची नावे जाहीर करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत. नागरिकांचे प्राण धोक्यात घालणाऱ्यांना केवळ दंड व नोटिसा देऊन सोडणे हा भेसळखोरांना संरक्षण देण्यासारखा प्रकार आहे. केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता नागरिकांनीही आपल्या आरोग्याची जबाबदारी ओळखली पाहिजे. गोडधोड घेताना त्याची गुणवत्ता तपासावी. शंका आल्यास लगेच अन्न व औषध प्रशासनात तक्रार नोंदवावी, असे आवाहन डॉ.चलवादींनी नागरिकांना केले आहे.

# सरकारची मराठा-ओबीसी ऐक्याला धक्का देणारी भूमिका - डॉ. संजय लाखे पाटील; उपसमितीला पडताळणीचा अधिकार नाही

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** मराठा आरक्षण आणि काल मुंबईत मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या ओबीसी नेत्यांच्या बैठकीनंतर राज्यात नव्या राजकीय समीकरणांना आणि तणावाला खतपाणी घालणारे वक्तव्य समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर मराठा क्रांती मोर्चा महाराष्ट्राचे मुख्य समन्वयक डॉ. संजय लाखे पाटील यांनी आज (दि. ५ ऑक्टोबर २०२५) दुपारी ४ वाजता आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत राज्य सरकारवर गंभीर आरोप केले.डॉ. लाखे पाटील म्हणाले की, सरकारचा कारभार आग्या मोहळला दगड मारल्यास तो दगड मरणाऱ्यांनाही चावतो, अशा पद्धतीने सुरू आहे. सत्ताधाऱ्यांकडून समाजात जाणूनबुजून तणाव निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.ते पुढे म्हणाले की, ओबीसी उपसमितीला कुणबी प्रमाणपत्रांच्या पडताळणीचा अधिकार नाही.राज्याचे मंत्री बावनकुळे यांनी ओबीसी उपसमिती प्रमाणपत्र पडताळणी करेल असे विधान केले, मात्र असा कोणताही अधिकार त्यांच्या कडे नाही. 'माधुरी पाटील प्रकरणा'नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विशिष्ट कायदे आणि मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत. पडताळणी प्रक्रियेला ठराविक न्यायिक चौकट आहे, त्यात मंत्री हस्तक्षेप करू शकत नाहीत, असे डॉ. लाखे पाटील यांनी स्पष्ट केले.



**सरकार जातीय तणाव भडकवत आहे - आरोप**

लाखे पाटील यांनी सरकारवर आरोप करताना म्हटले की, राज्य सरकार निवडणुका समोर ठेवून समाजात फूट पाडण्याचे राजकारण करत आहे. राज्यात ओला दुष्काळ, शेतकऱ्यांचे प्रश्न, आणि रोजगाराच्या समस्या असताना, लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी जातीय वाद छेडले जात आहेत.ते पुढे म्हणाले की, राज्य सरकारमधील काही मंत्री कायदा आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण करणारे वक्तव्य करत आहेत. यामुळे समाजात परस्पर वैरभाव वाढण्याची शक्यता आहे. सरकारने असा समाजविघातक कारभार थांबवावा.सरकारने सर्व समित्या रद्द कराव्यात. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षते खाली शांतता समिती बनवावी, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना त्यात घ्यावे व अशावेळी सर्वांना एकत्र बोलावून निर्णय घेणे आवश्यक आहे. ओबीसी आणि मराठा समाज एकत्र येऊ नये म्हणून सत्ताधाऱ्यांचे प्रयत्न डॉ. लाखे पाटील यांनी असेही म्हटले की,सरकार जाणूनबुजून ओबीसी आणि मराठा समाजामध्ये मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. जात पडताळणीच्या नावाखाली समाजातील सौहार्द धोक्यात आणले जात आहे. बावनकुळे यांनी कोणत्या अधिकारातून असे आदेश दिले हे स्पष्ट करावे.

**शासनाने समजूतदारपणे निर्णय घ्यावा**

पत्रकार परिषदेत अखेर डॉ. लाखे पाटील यांनी राज्य सरकारला आवाहन केले की, राज्याच्या वैधानिक रचनेचा भंग करून शासन चालवण्याचा प्रयत्न थांबवावा. कायदा आणि संविधानाचा आदर राखूनच शासन निर्णय घ्यावेत.

# वंजारी समाजाला अनुसूचित जमात श्रेणीमध्ये समाविष्ट करण्यासाठी संजय शिरसाट यांचे उपोषण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** उपोषणकर्ते संजय शिरसाट म्हणाले की,वंजारी (जाती) समाजातील असून जे महाराष्ट्रात विमुक्त जाती आणि भटक्या जमाती (VJNT) अंतर्गत वर्गीकृत आहे.याद्वारे महाराष्ट्र शासनाला औपचारिकपणे कळवित आहोत की, मी स्वतः ०३ ऑक्टोवर २०२५ पासून छत्रपती संभाजी नगर येथे अनिश्चित काळासाठी उपोषण केले आहे.हे शांततापूर्ण आंदोलन वंजारी समाजाला संविधान (अनुसूचित जमात) आदेश, १९५० अंतर्गत अनुसूचित जमात (ST) श्रेणीमध्ये समाविष्ट करण्याच्या समाजातील दीर्घकाळ प्रलंबित मागणीसाठी आहे.वंजारी समाज, जो ऐतिहासिकदृष्ट्या भटक्या गटाचा आहे आणि त्याची स्वतःची सांस्कृतिक प्रथा आणि सामाजिक-आर्थिक मागासलेपण आहे.तो लोकूर समिती (१९६५) च्या निकषांना पूर्ण करतो, ज्यामध्ये प्राचीनता, भौगोलिक अलगाव आणि शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण यांचा समावेश आहे. राज्य सरकारला वारंवार निवेदने सादर करूनही, आणि अधिकाऱ्यांच्या आश्वासनांनंतरही,आमच्या समावेशासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. या विलंबामुळे आमच्या समाजाला तीव्र त्रास झाला आहे आणि आमची उपेक्षा कायम आहे, जो महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा मोठा हिस्सा आहे. हे उपोषण भारतीय संविधानाच्या कलम १४, १५ आणि २१ अंतर्गत हमी दिलेल्या न्याय आणि समानतेची मागणी करण्यासाठी आमच्या निश्चयाचा अहिंसक अभिव्यक्ती आहे. त्यांच्या खालील मागण्या आहेत:




१.महाराष्ट्र शासनाने तात्काळ वंजारी समाजाला ST श्रेणीमध्ये समाविष्ट करण्याची शिफारस करणारा औपचारिक प्रस्ताव भारत सरकारच्या आदिवासी व्यवहार मंत्रालयाकडे सादर करावा.

२.प्रस्तावासाठी आवश्यक मानववंशशास्त्रीय आणि सामाजिक-आर्थिक अभ्यास पूर्ण करण्यासाठी निश्चित वेळेच्या योजनेची घोषणा.३.आमच्या मागणीच्या प्रगतीबाबत समाजाशी पारदर्शक संवाद. हे उपोषण शांततापूर्ण आणि सर्व कायदेशीर नियमांचे पालन करून आयोजित केले जाईल, आणि स्थानिक अधिकाऱ्यांना सार्वजनिक सुरक्षेसाठी पूर्वसूचना दिली जाईल.आम्ही सरकारला आमच्या प्रतिनिधींशी संवाद साधून हा विषय सौहार्दपूर्णपणे सोडवण्याचे आवाहन करतो, जेणेकरून आंदोलन तीव्र होणार नाही.जर ०२ ऑक्टोबर पर्यंत समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही, तर आम्हाला आमचे आंदोलन तीव्र करण्यास भाग पाडले जाईल.आमच्या वैध मागणीवर तात्काळ लक्ष देऊन आणि कारवाई करून आमच्या समाजाला पुढील त्रास टाळण्यासाठी मी आपल्याकडे प्रामाणिकपणे विनंती करतो असे संजय भास्कर शिरसाट,अधीवक्ता उच्च व सर्वोच्च न्यायालय यानी सांगीतले.या वेळी विविध संघटना पदअधिकारी भेटीसह पाटीबां देत आहेत.

### सदाभाऊ म्हणाले, फडणवीसांसाठी प्राणही देईन..

# राजू शेट्टींचा पलटवार, लवकर देऊन टाका, म्हणजे महाराष्ट्र मोकळा होईल

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोलापूर /प्रतिनिधी/** राज्यातील मराठवाड्यात गेल्या ८ दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यासाठी, आज शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सोलापूर आणि धाराशिवमध्ये पाहणी दौरा केला. यावेळी, सरकारवर जोरदार टीका करत, माजी सहकारी आणि आमदार सदाभाऊ खोत यांनाही जोरदार टोला लगावला. धाराशिवमध्ये राणी बारकूल नावाच्या महिला आंदोलन करत आहेत, त्यांच्या सासऱ्याला अतिवृष्टीमुळे धक्का बसला आणि त्यांचा मृत्यू झाला. त्या भगिनीची समजूत घालून त्यांचे उपोषण सोडायला लावले. तसेच, येथील पाच ते सहा आत्महत्याग्रस्त कुटुंबातील लोकांची भेट घेतल्याचे राजू शेट्टींनी सांगितले.

शेतकऱ्याला आता आधाराची गरज आहे. पण, सरकार मीठ चोळण्याचे काम करत आहे. सोलापुरात देखील प्रचंड नुकसान झाले आहे, माती वाहून गेलीय, विहिरी बुजल्या आहेत. पिकांची गिनती करता येणार नाही, अशी स्थिती आहे. जलसंपदा आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयाचा अभाव असल्याचेही शेट्टींनी म्हटले.



जनतेचे, शेतकऱ्यांचे मूळ प्रश्न बाजूला रहाव्यात यासाठी सरकारने काही माणसं पेरली आहेत. जी जाणीवपूर्वक वादग्रस्त वक्तव्य करतात आणि विषय दुसरीकडे नेतात, माध्यम देखील यातून सुटलेले नाहीत, असे म्हणत अप्रत्यक्षपणे भाजप नेत्यांवर टीका केली. तसेच, सदाभाऊ खोत यांनाही खोचक टोला लगावला. रयत क्रांती संघटनेचे प्रमुख आणि आमदार सदाभाऊ खोत यांच्या वक्तव्यावर शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीससाठी प्राण देऊ, असे वक्तव्य सदाभाऊ खोत यांनी केले होते. त्यावर, प्रतिक्रिया देताना राजू शेट्टी म्हणाले, ज्यांना ज्यांना प्राण द्यायचं आहे, त्यांना देऊन टाका म्हणा लवकर, म्हणजे महाराष्ट्र मोकळा होईल एकदाचा, असा खोचक टोला शेट्टींनी लगावला.

तसेच, प्राण द्या म्हणा एकदा, आम्हाला त्यांची निष्ठा तपासायची आहे, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायत निधीच्या फंडावरुन साखर कारखान्यांना इशाराच दिला आहे. शेतकऱ्यांचा काटा मारणाऱ्या साखर कारखान्यांची यादीच माझ्याकडे आहे, असे फडणवीसांनी म्हटलं होतं. त्यावरुन, राजू शेट्टींनी पलटवार केला आहे. शरद पवारांना ही यादी कशाला देता, अमित शाह यांना द्या, असे राजू शेट्टींनी म्हटले. तसेच, तुम्ही कारवाई करा? पवारांना यादी देऊन काय करणार ते काय सत्तेत आहेत का? असा सवाल देखील राजू शेट्टींनी विचारला. सरकारमध्ये बसलेल्या लोकांचं आणि शेतकऱ्यांचा काही संबंध आहे का? हे तपासायला पाहिजे. एकनाथ शिंदे याना कळलं आहे की शेतकऱ्यांपेक्षा जास्त पैसा रस्त्यात आहे. अजित पवार यांच्या लीला काय सांगाव्यात? असे म्हणत दोन्ही नेत्यांवर जोरदार टीका केली. अमित शाह यांनी बरोबरच म्हटलं हे सगळे बनियापेक्षा मोठं आहेत, बिहारमध्ये निवडणुका असल्याने तिथं केंद्राने जास्त मदत केली. पण, सर्वात जास्त जीएसटी महाराष्ट्र भरत असला तरीही येथे मदत दिली जात नाही, कारण गृहीत धरलं जातं आहे, असेही राजू शेट्टींनी म्हटलं.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२११२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813